दैनिक निळे प्रतीक

### गडकरींना खासगी विमानाने प्रवास टाळण्यास सांगणार

**मुंबई**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातानंतर राज्याच्या राजकारणात शोककळा पसरली असतानाच, आता बड्या नेत्यांच्या प्रवासातील सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना एक महत्त्वाचा आणि मित्रत्वाचा सल्ला देणार असल्याचे माजी गृहमंत्री आणि शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी म्हटले आहे. अजित पवारांचा अपघात हा संशयास्पद असून, नितीन गडकरी यांनी आता छोट्या आणि खासगी विमानाने प्रवास करणे टाळावे. असे सांगणार आहे. असे अनिल देशमुख म्हणालेत.अजित पवारांच्या निधनामुळे व्यथित झालेल्या अनिल देशमुखांनी सुरक्षेच्या कारणास्तव नितीन गडकरी यांच्याबद्दल चिंता व्यक्त केली. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, अजित पवारांचा झालेला अपघात मनाला चटका लावणारा आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे जर मला कधी विमानतळावर भेटले, तर मी त्यांना नक्की सांगेन की, तुम्ही आता छोट्या आणि खासगी विमानाने प्रवास करू नका. अशा विमानांच्या सुरक्षेबाबत आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे.

### याबाबत मुख्यमंत्री निर्णय घेतील–पंकजा मुंडे

**मुंबई**–माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनानंतर राज्य सरकारची महत्त्वाकांक्षी योजना लाडकी बहीण योजनेला अजित पवारांचे नाव देण्याची मागणी केली जात आहे. राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी ही मागणी केली आहे. यावर भाजप नेत्या व मंत्री पंकजा मुंडे यांनी देखील सकारात्मक प्रतिक्रिया दिल्याचे पाहायला मिळत आहे.लाडकी बहीण योजनेला अजित पवारांचे नाव देण्यात यावे अशी मागणी केली जात असून यावर मंत्री पंकजा मुंडे यांना विचारले असता, या योजनेला अजितदादा पवारांचे नाव देण्याबाबत मागणीवर मुख्यमंत्री निर्णय घेतील. त्याला आमचे समर्थन राहील, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले आहे. लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारार्थ आयोजित सभेनंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या.पंकजा मुंडे यांच्या देखील हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाला होता. यावर त्यांनी सांगितले की, हे मला सकाळी सांगण्यात आले. काय बिघाड झाला माहीत नाही. मी दौऱ्यावर निघणार होते त्यावेळी मला कळवण्यात आले की हेलिकॉप्टर उडू शकणार नाही.

● छत्रपती संभाजीनगर ● वर्ष : २ रे ● अंक : १५४ वा ● बुधवार दि.४ फेब्रुवारी २०२६ ●किंमत ५.०० रू ● पाने : ०४ ● nilepratik02@gmail.com ● दैनिक

# संसदेत संजय राऊतांचा घणाघात


## केंद्र सरकारवर गंभीर प्रश्न, संसदेत खळबळ

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

संसदेच्या अधिवेशनात काल खासदार संजय राऊत यांनी सत्ताधाऱ्यांना अडचणीत आणणारे थेट आणि ज्वलंत प्रश्न उपस्थित करत सभागृह हादरवून सोडले. अजित पवार प्रकरण, लडाखचे पर्यावरण कार्यकर्ते सोनम वांगचूक यांचे आंदोलन आणि लोकशाहीतील दडपशाही, या मुद्द्यांवर राऊत यांनी केंद्र सरकारला जाब विचारला.देशात काही घडले की सरकार मौन बाळगते. प्रश्न विचारले की आवाज दाबला जातो, असे परखड शब्दांत सांगत राऊत यांनी सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर कठोर टीका केली.

**अजित पवार प्रकरणावर थेट सवाल**

भाषणादरम्यान संजय राऊत यांनी अजित पवार संदर्भातील घटनांवर संशय व्यक्त करत पारदर्शकतेचा मुद्दा ऐरणीवर आणला.



एवढ्या मोठ्या राजकीय व्यक्तिमत्त्वाबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत, पण सरकारकडून स्पष्ट उत्तर दिले जात नाही. सत्य काय आहे, हे देशाला कधी सांगणार? असा थेट सवाल त्यांनी सभागृहात केला.लोकशाहीत प्रश्न विचारणे हा गुन्हा नसून, उत्तर देणे ही सत्तेची जबाबदारी असल्याचे राऊत यांनी ठामपणे सांगितले.

**'वांगचूकचे काय झाले?' लडाखचा प्रश्न संसदेत**

राऊत यांनी लडाखमधील पर्यावरणवादी व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या आंदोलनाचा मुद्दा उपस्थित करत केंद्र सरकारला जाब विचारला.
वांगचूक लडाखसाठी, पर्यावरणासाठी, स्थानिक लोकांच्या हक्कांसाठी शांततेने लढत आहेत. त्यांचे काय झाले? ते जिवंत आहे का..?त्यांच्याशी संवाद का नाही? असा सवाल करत राऊत यांनी सरकारच्या संवेदनशून्यतेवर टीका केली.देशभरात आंदोलन करणाऱ्यांशी संवादाऐवजी दुर्लक्ष आणि दडपशाही केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

**'ही संसद आहे की हुकूमशाहीचा दरबार?'**

संजय राऊत म्हणाले,अजित पवारांबाबत मृत्यू प्रश्न विचारले जातात, वांगचूकबाबत प्रश्न विचारले जातात,पण सरकार उत्तर देण्याऐवजी गोंधळाचा ठपका ठेवते. ही संसद आहे की हुकूमशाहीचा दरबार?माईक बंद करणे, चर्चेला परवानगी न देणे आणि विरोधकांना थांबवणे ही लोकशाहीची गळचेपी असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

**खासदार निलंबनाचा संदर्भ**

या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षातील ७ ते ८ खासदारांचे निलंबन करण्यात आले. यावर प्रतिक्रिया देताना राऊत म्हणाले की, निलंबन हा शिस्तीचा नव्हे तर प्रश्न विचारणाऱ्यांना गप्प करण्याचा मार्ग बनत आहे.विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला.

**'प्रश्न विचारणारच' राऊत ठाम**

भाषणाच्या शेवटी संजय राऊत यांनी स्पष्ट भूमिका मांडली–अजित पवार असो, वांगचूक असो किंवा लोकशाहीचा प्रश्न असो–आम्ही प्रश्न विचारणारच. आवाज दाबण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी विरोधक गप्प बसणार नाहीत.या भाषणानंतर संसदेतील वातावरण तापले असून, राजकीय वर्तुळात तीव्र चर्चा सुरू झाली आहे.

## औरंगाबाद शहरात पुन्हा अतिक्रमण हटाव मोहीम, नगरसेवकांनी विरोध केल्यास पद होणार रद्द, या रस्त्यांवर होणार कारवाई

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून शांत असलेली महानगरपालिकेची अतिक्रमण हटाव मोहीम पुन्हा एकदा सुरु करण्यात येणार असल्याची माहिती मनपा आयुक्त जी श्रीकांत यांनी दिली आहे. शहरातील ८ प्रमुख रस्त्यांवर ही कारवाई करण्यात येणार असून या कारवाईला विरोध करणाऱ्या नगरसेवकांचे पद रद्द करण्याचा इशारा देखील मनपा आयुक्तानी दिला आहे. या अगोदर शहरातील ८ प्रमुख डी.पी रोडवर मनपाकडून टोटल स्टेशन सर्वे करून मार्किंग करण्यात आली आहे. याच रोडवर ही कारवाई करण्यात येणार आहे अशी माहिती मनपा आयुक्तांनी दिली आहे.

या प्रमुख रस्त्यांवर होणार अतिक्रमण हटाव कारवाई

१. चंपा चौक ते जालना रोड
२. दिल्ली गेट ते हर्सूल टी–पॉईंट
३. टी–पॉईंट ते सावंगी बायपास
४. सेव्हनहील ते सूतगिरणी चौक
५. सूतगिरणी चौक ते उस्मानपुरा, भाजीवाला बाई पुतळा
६. नक्षत्रवाडी ते सोलापूर बायपास
७. रेणुकामाता मंदिर ते सातारा परिसर
८. कांचनवाडी गट.क्र.४२ लॉ.कॉलेज



### अजितदादांचा तेरावा झाल्यावरच राजकीय चर्चा

## सुनेत्रा पवारांच्या शपथविधीबद्दल माहित नव्हते–रोहित पवार बोलले

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या अकाली निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक घडामोडी घडत आहेत. विशेषतः राष्ट्रवादी पक्षात व पवार कुटुंबात देखील अनेक हालचाली सुरू असल्याचे दिसून येत आहे. परंतु, या सगळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार सावध भूमिका घेताना दिसत आहे. तसेच त्यांनी अजितदादांचा तेरावा होईपर्यंत कुठलेही राजकीय भाष्य करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे.रोहित पवार म्हणाले, अजितदादांची बातमी आपण ऐकली, बातमी खरी आहे का स्वप्न आहे हे आम्हालाही कळत नाही. आजपर्यंत आम्ही त्या दुःखात आहोत, त्या विमानात आणखी जे होते त्यांचाही परिवार दुःखात आहे. काही दिवसांपूर्वी कळले की, दिंडोरी तालुक्यातील सुदाम बोडके हे अजित दादांचे आणि साहेबांचे कट्टर कार्यकर्ते आहेत. जेव्हा त्यांना अजित दादांच्या निधनाची बातमी कळली, तेव्हा अस्वस्थ झाले नंतर ते हॉस्पिटलमध्ये गेले आणि हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचा मृत्यू झाला. आज पवार परिवार आणि हा परिवार दुःखात आहे. त्यामुळे मी बोडके कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले, असे रोहित पवार म्हणाले.पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले,



तेरावा ज्या दिवशी होईल, त्या दिवशी मी पत्रकार परिषद घेऊन सांगेल, आता राजकीय बोलणे योग्य नाही. दादांसोबत काय चर्चा झाली, सगळ्या प्रक्रियेत मी होतो. मात्र तेरा दिवसांनी सांगेल, असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे व्हायरल व्हिडिओमध्ये रोहित पवार आणि अजित पवारांचे काय बोलणे झाले, याबाबत त्यांनी बोलणे टाळले आहे.सुनेत्रा पवारांच्या शपथविधी संदर्भात विचारले असता रोहित पवारांनी परखड मत मांडले आहे. ते म्हणाले, अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष वेगळा आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री पदाबाबत निर्णय घेताना पक्षाचे सुनील तटकरे, धनंजय मुंडे, छगन भुजबळ आणि प्रफुल्ल पटेल होते. या नेत्यांची सुनेत्रा काकी यांच्याशी चर्चा झाली असेल, राजकारणात अनुभव कमी असला तरी त्या अनेक वर्षांपासून समाजकारणात काम करतात.तसेच शपथविधी होणार असल्याचे आम्हाला कोणालाही माहित नसल्याचे रोहित पवारांनी म्हटले आहे. लाखो लोक बारामतीमध्ये पवार कुटुंबाला भेटण्यासाठी येत होते. पार्थ देखील होता. संपूर्ण महाराष्ट्र येऊन भेटत नाही, सांत्वन करत नाही तोपर्यंत आपण बारामतीत थांबले पाहिजे. आम्हाला शपथविधीची बातमी देखील टीव्हीच्या माध्यमातून समजली, असे रोहित पवारांनी स्पष्ट केले आहे.

## शालेय विद्यार्थ्यांना उत्तम आहार उत्तम आरोग्याबाबत मार्गदर्शन

### चांगलं खा;चांगलं व्हा–जिल्हाधिकारी दिलीप स्वामी





**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

शारिरीक आणि मानसिक स्वास्थ्य उत्तम राखण्यासाठी दिनचर्या आणि आहार हे चांगले असायला हवे. उत्तम आरोग्य असेल तरच पुढची पिढी देशाच्य विकासात योगदान देऊ शकेल. त्यासाठी चांगलं खा आणि चांगलं व्हा, असा संदेश आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज विद्यार्थ्यांना दिला.

एमआयटी हायस्कूल सिडको एनफोर येथे 'संस्कार दशसूत्री' चा या उपक्रमांतर्गत आरोग्य समुपदेशन कार्यक्रम संपन्न झाला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व मनपा आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा यांनी आहार, दिनचर्या आणि आरोग्य याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. मेघा जोगदंड, शिक्षणाधिकारी आश्विनी लाठकर, आयएमए अध्यक्ष डॉ. अनुप टाकळकर,डॉ.पूजा करोले, शिक्षण विस्तार अधिकारी मनीषा वाशिंबे, शिक्षण विस्तार अधिकारी कल्पना पदकोंडे तसेच एमआयटी शाळेचे मुख्याध्यापक संजय वानखेडे, संत मीरा शाळेचे मुख्याध्यापक अनिल पाटील, महर्षी शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती उषा मालोदे,तसेच आनंद विद्या मंदिर चे मुख्याध्यापक गणेश मालोदे आणि या शिक्षक वृंद उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी परिसरातील महर्षी विद्यालय, संत मीरा विद्यालय, आनंद विद्यामंदिर या शाळांचे विद्यार्थीही एमआयटी शाळेच्या प्रांगणात जमले होते. या चारही शाळांमधील सुमारे एक हजार विद्यार्थ्यांनी आज आरोग्य विषयक शपथ घेतली.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, शारीरिक आरोग्या सह मानसिक आरोग्य आवश्यक आहे. सक्षम भविष्य निर्माण करायचं असेल तर आजच्या विद्यार्थ्यांनी आपले आरोग्य जपावे. बाजारात आकर्षक पॅकिंग मध्ये मिळणारे जंक फूड, फास्ट फूड, कोल्ड ड्रिंक मुळे शरिरावर दुष्परिणाम होतात. त्यापेक्षा आईने बनवलेली भाजी, चपाती, भाकरी हे अन्न सकस आणि पौष्टिक असते. असे चांगले अन्न खा आणि चांगले व्हा, असे त्यांनी सांगितले.

याच कार्यक्रमात मनपा आरोग्य अधिकारी डॉ. पारस मंडलेचा,डॉ.मेघा जोगदंड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२२२४ शाळांमध्ये आरोग्य समुपदेशन या उपक्रमाची सुरुवात दि.२८ पासून करण्यात आली. आतापर्यंत २२२४ शाळांमध्ये आरोग्य समुपदेशन करण्यात आले. त्यात शहरातील ४७५ शाळांमध्ये आरोग्य विषयक समुपदेशन करण्यात आले होते. त्यात १ लाख २ हजार ५२२ विद्यार्थी तर २८४३ शिक्षकांचा सहभाग होता. शिवाय ग्रामीण भागातील १५४२ शाळांमधील २ लाख ३४ हजार ७०८ विद्यार्थी तर ५३१२ शिक्षकांचा समावेश होता.आज शहरातल्या २०७ शाळांमध्ये आरोग्यविषयक समुपदेशन शिबीरे पूर्ण झाली. प्रास्ताविक श्रीमती मनीषा वाशिंबे यांनी तर सूत्रसंचालन श्रीमती कविता रगडे यांनी केले. मुख्याध्यापक संजय वानखेडे यांनी आभार मानले.

## आपल्या संसदेत नाही, मग पाकिस्तानमध्ये प्रश्न मांडायचे का?:आदित्य ठाकरेंचा सवाल

### राहुल गांधींच्या भूमिकेचे केले समर्थन

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मुंबई। प्रतिनिधी**




देशाच्या संसदेत प्रश्न मांडायचा नाही तर मग कुठे मांडायचा, संसदेत खासदारांनाच बोलू देत नाहीत, आपल्याच संसदेत बोलू दिले जात नाही, असा सवाल शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. संसदेत झालेल्या गदारोळावर आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आपण आपल्या संसदेत विषय मांडायचा नाही मग पाकिस्तानच्या संसदेत जाऊन मांडायचा का? की चीनच्या संसदेत जाऊन हा विषय मांडायचा? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.आदित्य ठाकरे म्हणाले, देशाच्या संसदेत बोलू देत नाहीत. आपल्याच संसदेत बोलू दिले जात नाही. नरवणे यांच्या पुस्तकात काय लिहिले आहे हे समोर यायला पाहिजे, असे म्हणत काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या भूमिकेचे समर्थन आदित्य ठाकरे यांनी केले आहे. आदित्य ठाकरे यांनी आज बारामती विमान अपघातात मृत्युमुखी पडलेल्या पिंकी माळी यांच्या वरळी येथील घरी जाऊन कुटुंबांची सांत्वनपर भेट घेतली. या भेटीनंतर या अपघाताची चौकशी व्हायला हवी, अशी मागणी आदित्य ठाकरेंनी केली आहे.आदित्य ठाकरे म्हणाले, अजित पवारांच्या विमान अपघाताबाबत अनेक अँगल आहेत, त्यामुळे ते पुढे यायला हवे. चांगला नेता आपण गमावला आहे. २०१९–२० पासून अजित पवारांसोबत वेगळा बॉन्ड होता, अजित दादा काम करणारा नेता होता, असे ठाकरे यावेळी म्हणाले.डोकलाम हद्दीत चीनच्या घुसखोरीवरून संसदेत झालेल्या गदारोळावर बोलताना आदित्य ठाकरे म्हणाले, आपण आपल्या संसदेत विषय मांडायचा नाही, मग पाकिस्तानच्या संसदेत जाऊन मांडायचा का? तसेच माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांच्या पुस्तकात काय लिहिले आहे, वस्ताव काय होते? ते समोर यायला पाहिजे. हे सरकार राहुल गांधींना का घाबरत आहे? असा प्रश्न ठाकरेंनी उपस्थित केला आहे. भारत आणि चीनच्या सीमारेषांसंदर्भातील डोकलामचा विषय चीनच्या संसदेत जाऊन मांडायचा का? असा सवाल आदित्य ठाकरेंनी उपस्थित केला आहे.

संपादकीय

# मुंबई विद्यापीठ प्रशासनाची हिटलरशाही पालि ज्ञानावरचा हल्ला

मुंबई विद्यापीठ हे ज्ञानाचे मंदिर आहे की सत्तेचा किल्ला, असा प्रश्न आज निर्माण झाला आहे. कारण गेल्या पाच महिन्यांपासून शांततेच्या मार्गाने, संविधानिक चौकटीत राहून, केवळ पालि भाषा, बौद्ध अध्ययन आणि वंचित विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आंदोलन करणाऱ्या भन्ते विमांसा यांच्यावर विद्यापीठ प्रशासनाने उघड दडपशाही सुरू केली आहे. हे चित्र लोकशाहीतील शैक्षणिक स्वायत्ततेला शोभणारे नाही, तर थेट हिटलरशाहीची आठवण करून देणारे आहे.पालि ही केवळ एक भाषा नाही, तर बुद्ध, धम्म आणि सामाजिक समतेचा बौद्धिक वारसा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्याला आधुनिक भारताच्या सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले, त्या पालि भाषेसाठी स्वतंत्र पालि भवन, पालि विभागाला शासकीय अनुदान आणि वंचित विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह,या मागण्या कोणत्याही प्रकारे बेकायदेशीर, अवाजवी किंवा राष्ट्रविरोधी नाहीत. तरीही मुंबई विद्यापीठ प्रशासनाने या मागण्यांकडे पाच महिने डोळेझाक केली आणि अखेर आंदोलन मोडीत काढण्यासाठी बळाचा वापर केला.१ फेब्रुवारी रोजी पहाटे आंदोलनस्थळावरील तंबू, बॅनर, साहित्य जबरदस्तीने हटविणे, वसतीगृहाची खोली सील करणे आणि भन्ते विमांसा यांना अक्षरशः रस्त्यावर आणून उघड्यावर आंदोलन करण्यास भाग पाडणे,ही कारवाई विद्यापीठ प्रशासनाची मग्रुरी दर्शवते. कडाक्याच्या थंडीत एका भिक्खूला, एका संशोधकाला, एका आंदोलनकर्त्याला उघड्यावर बसवणे हे कोणत्या कायद्याच्या, कोणत्या नैतिकतेच्या चौकटीत बसते?याहून गंभीर बाब म्हणजे, भन्ते विमांसा यांना पाठिंबा देण्यासाठी आलेल्या ४० कार्यकर्त्यांना अटक करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने थेट पोलिसांना पत्र देणे. मध्यरात्री दीड वाजेपर्यंत कार्यकर्त्यांना पोलिस ठाण्यात डांबून ठेवणे हे लोकशाही अधिकारांवरचे आक्रमण नाही तर काय? आंदोलनाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि संघटन स्वातंत्र्य हे संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार आहेत. विद्यापीठ प्रशासन कोणत्या अधिकाराने हे अधिकार पायदळी तुडवत आहे?भन्ते विमांसा यांच्यावरील अन्याय इथेच थांबत नाही. १५ सप्टेंबर २०२५ रोजी केंद्रीय मंत्री किरण रिजीजू यांनी भेटीची वेळ दिली असतानाही विद्यापीठ प्रशासनाने भन्ते विमांसा यांना मंत्री भेटू दिले नाहीत. उलट, सुरक्षारक्षकांकडून त्यांना मारहाण करण्यात आली, कपडे फाटले, गंभीर जखमी अवस्थेत त्यांना आयसीयूमध्ये दाखल करावे लागले. पण मारहाण करणाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी उलट भन्ते विमांसा यांच्यावरच एफआयआर दाखल करण्यात आला. ही प्रशासनाची भूमिका अन्यायकारक नाही तर सूडबुद्धीची आहे.या सगळ्याची परिसीमा म्हणजे भन्ते विमांसा यांना पीएच.डी. शिक्षणातून बेदखल करण्यात आले. संशोधन करणारा विद्यार्थी, भिक्खू आणि आंदोलनकर्ता,या तिन्ही ओळखींचा वापर करून प्रशासनाने त्यांना संपवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रश्न असा आहे की, मुंबई विद्यापीठाला पालि भाषा नको आहे की पालि भाषेच्या माध्यमातून येणारा समतेचा विचार नको आहे?पालि संवर्धन समिती आणि आंबेडकरी संघटनांनी घेतलेली आक्रमक भूमिका ही स्वाभाविक आहे. कारण हा प्रश्न एका व्यक्तीपुरता मर्यादित राहिलेला नाही; हा प्रश्न बहुजनांच्या शैक्षणिक हक्कांचा, बौद्धिक स्वातंत्र्याचा आणि सामाजिक न्यायाचा आहे. जर आज भन्ते विमांसा यांचा आवाज दडपला गेला, तर उद्या कोणत्याही वंचित घटकाच्या प्रश्नांवर असेच दडपशाही केली जाईल.मुंबई विद्यापीठ प्रशासनाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, इतिहास साक्षी आहे, ज्ञानावर, विचारांवर आणि आंदोलनांवर कितीही दडपशाही केली, तरी सत्याचा आवाज थांबत नाही. पालि भाषा, बौद्ध विचार आणि आंबेडकरी चळवळ या केवळ अभ्यासक्रमातील विषय नाहीत, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची परंपरा आहेत.आज गरज आहे ती शासनाने आणि समाजाने या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याची. भन्ते विमांसा यांच्यावरील अन्याय तात्काळ थांबवावा, त्यांचे शैक्षणिक अधिकार पुनर्स्थापित करावेत आणि पालि भवन व अनुदानाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा, मुंबई विद्यापीठाच्या या हिटलरशाहीविरोधात उभा राहणारा आवाज आणखी बुलंद होईल,आणि तो आवाज दबावाने नव्हे, तर न्यायानेच शांत होऊ शकतो.

## पुन्हा परजावेच लागेल



किती जीवघेणा झालाय वर्तमान
आणि कालचाही काळ
तसाच होता
उद्याचाही काळ यापेक्षाही
छळ-छावणीचाच असणार आहे
कुठेही माझे जगणे
सुरक्षित नाहीय
मला अडकवले जातेय
हरएक क्षणाला चक्रव्यूहात
झुंजतो आहे मी
हरएक काळात,
पराभवाचे रस्ते
सोडत नाहीय
अजूनही माझा पिच्छा
संविधानाचे शस्त्र आणिअस्त्र
आहे म्हणूनच आलोय
मी इथपर्यंत
तर तेही बोथट केले जातेय
अलीकडे बिंधास्त
एक दिवस खिळखिळे
करुन सोडतील हे परंपरावादी माझ्या
सन्मानाच्या
जगण्याला
पुन्हा उठावाचे दिवस
उगवताहेत सभोवती
काहीही करुन सामोरे
गेलेच पाहिजे त्यांना
मी चिंतेत आहे अधिकच
माझ्या पुढच्या पिढीसाठी
पुन्हा परजावेच लागेल
मला माझ्या संविधानिक
शब्द शस्त्रांना आणि अस्त्रांनाही

–शशिकांत हिंगोणेकर

# राजा ढालेंच्या समक्ष माईंच्या संतापाचा स्फोट झाला तेव्हा...

डॉ माईसाहेब आंबेडकर यांच्या वाट्याला डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणानंतर होरपळ,ससेहोलपट, अज्ञातवास आला होता. त्याबद्दलची माईंची कैफियत त्यांच्या 'डॉ आंबेडकरांच्या सहवासात' या आत्मचरित्रातून जगासमोर यायला १९९० साल उजाडावे लागले. म्हणजे त्यांच्या यातना, दुःख तब्बल ३४ वर्षांनंतर लोकांपर्यंत पोहोचले.पण माईंवर झालेल्या घोर अन्यायाची कथा आणि त्यांच्या शोकांतिकेचे खरे कारण त्यांच्याच मुखातून पँथर नेते राजा ढाले आणि त्यांच्या पत्नी दिक्षाताई ढाले यांच्यासमक्ष मला ऐकता आली होती. विशेष म्हणजे, मी विचारलेल्या सवालानंतर माईंच्या संतापाचा स्फोट झाला होता. त्यांचा अश्रूंचा बांध फुटला होता. ही गोष्ट आहे १९७४ सालातली. त्यावेळी माईंनी सांगितलेली कैफियत ऐकून आम्ही सारे जण नि:शब्द झालो होतो.

स्थळ होते दादर ( पूर्व) येथील 'अमीन मेन्शन' मधील डी. डी. बाविस्कर यांचे घर. राजा ढाले हे नागपूरला लग्न झाल्यानंतर नवपरिणीत वधुसह मुंबईत नुकतेच परतले होते. ते नवविवाहित जोडपे तिथे आले होते. आम्ही सर्वांनी त्या वधू- वराचे अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या. बावीस्कर म्हणजे आंबेडकर घराण्याचे अत्यंत विश्वासू व्यक्तिमत्त्व. भय्यासाहेब आंबेडकर यांचे ते निकटवर्तीय होते. बाविस्करांची आणखी एक ओळख इथे सांगावी लागेल. बऱ्याच वर्षांपूर्वी बाबासाहेबांचा कोट टायमध्ये, काठीवर हात ठेवलेला व बाजूला बुद्धांची मूर्ती असलेला एक फोटो बऱ्याच घरांमध्ये हमखास दिसायचा. तो फोटो काही लोकांच्या घरात अजूनही सापडू शकेल.तो फोटो बाविस्कर यांनीच प्रकाशित केला होता. त्याच्या खाली त्यांचे नावदेखील आहे.

बावीस्कर , माझे मित्र वसंत साळवे,व साहेबराव पानपाटील हे तिघे नेव्हल डॉकयार्ड मध्ये एकत्र कामाला होते. साळवे- पानपाटील यांच्यामुळे बाविस्कर यांच्याशी माझा परिचय झाला होता. तेव्हा मी माटुंगा लेबर कॅम्पातील गोल्डन स्पोर्ट्स क्लबचा अध्यक्ष व क्रीडा मंडळ ऐक्य समिती या १४ मंडळांच्या एकत्रित समितीचा सरचिटणीस होतो. आमचे क्रीडा क्षेत्रातील काम पाहून बाविस्कर हे खूप प्रभावित झाले होते. ते वारंवार आमच्या मंडळात येत असत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर माईसाहेब आंबेडकर यांना रिपब्लिकन नेतृत्वाच्या कुटील राजकारणामुळे अज्ञातवासात जावे लागले होते.



त्यांच्या वाट्याला उपेक्षा, तिरस्कार आणि एकांतवास आला होता. बाबासाहेबांच्या महानिर्वानानंतर दीर्घकाळ त्या कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमांत दिसल्या नव्हत्या.त्या पार्श्वभूमीवर, बाविस्कर यांच्या घरी आम्ही सारे माईसाहेब यांना पहिल्यांदाच पाहिले. त्यावेळी तिथे माझ्यासोबत वसंत साळवे, विनायक केदारे, उत्तम बनसोडे, साहेबराव पानपाटील हे मित्र होते. तसेच राजा ढाले त्यांच्या पत्नी दीक्षाताई सोबत तिथे उपस्थित होते. बाविस्कर यांनी सर्वप्रथम माईसाहेबांशी आमची ओळख करून दिली. आम्ही सगळेच स्तब्ध झालो. एतिकडे आमच्या उद्धारकर्त्याच्या पत्नीचे प्रत्यक्ष दर्शन घेण्याचे पुण्य लाभत होते तर दुसरीकडे 'बाबासाहेबांना विष देऊन मारले गेले' ही बालपणी कानावर पडलेली गोष्ट आठवून मनात माईसाहेब यांच्याविषयी तिरस्कारही दाटून आला होता.आम्ही आशा संभ्रमित अवस्थेत असतांना माईंनी बोलण्यास सुरुवात केली. त्यांनी बाबासाहेब आंबेडकरांची आपण कशा प्रकारे सेवा केली, हे सांगण्यास सुरुवात केली. त्याबरोबर मी त्यांना मध्येच थांबवून सरळ प्रश्न केला की,आमच्या तर कानावर आले आहे की, तुम्हीच बाबासाहेबांना विष पाजून मारले. माझ्या प्रश्नानंतर सगळे एकमेकांकडे पाहू लागले. माझ्या सवालावरून माई कमालीच्या चिडल्या होत्या. त्यांच्या संतापाचा स्फोट झाला होता. त्यांचा अक्षरशः तिळपापड झाल्याने शरीर थरथरत होते. नंतर त्यांच्या डोळ्यातून अश्रु वाहू लागले. बावीस्करांनी त्यांना पाणी देऊन शांत केले. मग मात्र त्यांनी स्वतःला सावरले. आणि आपली बाजू विस्तृतपणे सांगायला त्यांनी सुरुवात केली.माई सांगू लागल्या की, बाबा ज्या डॉक्टरांकडे नियमित औषधोपचार घ्यायचे, त्या ठिकाणी मी सहायक असल्यामुळे त्यांची सर्व तपासणी मीच करीत होते.त्यातून आमचा परिचय वाढला.त्यानंतरच बाबांनी माझ्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. पण तेव्हा जातीयवाद पराकोटीचा होता. त्यातच मी ब्राह्मण. त्यामुळे प्रचंड विरोध असतांना देखील मी बाबाशी विवाह करण्याची हिम्मत दाखवली.त्याचा मला आणि माझ्या कुटुंबाला काय त्रास झाला हे तुम्हाला सांगून समजणार नाही.बाबांशी लग्न केल्यानंतर मी नोकरी सोडून फक्त त्यांच्या प्रकृतीची काळजी घेण्याचेच काम केले. त्यामुळे बाबांचे आयुष्य वाढले आणि तसे बाबांनी त्यांच्या हयातीत लिहून देखील ठेवले आहे. मग हा गैरसमज कुणी पसरवला? आणि त्यानंतर त्यांनी बाबांच्या पश्चात कशाप्रकारे राजकारण खेळले गेले. त्यांना हेतुपुरस्सर बदनाम करून चळवळीपासून दूर जाण्यास भाग पाडले. हे माईंनी विस्तृतपणे सांगितले.त्यावेळच्या आमच्या पिढीला दिलेल्या चुकीच्या माहितीमुळे मी माईंविषयी पसरवण्यात आलेल्या संशयाचा मी त्यांच्यादेखत पुनरुच्चार करून बसलो होतो. त्यावेळच्या रिपब्लिकन पुढाऱ्यांनी केवळ नेतृत्व मिळावे, म्हणुन माईंना बदनाम करत त्यांना बाद करून टाकले होते. त्या कट कारस्थानांची कहाणी माईंच्या मुखातून सर्वात आधी ऐकण्याचे भाग्य आम्हाला लाभले. त्या दिवशी बाविस्कर यांनी आम्हाला खाऊ घातलेले गोड जेवणह कडू लागल्या सारखे वाटत होते.हा प्रसंग घडून तब्बल ५० वर्षे उलटून गेली आहेत. मधल्या काळात माईसाहेब, राजा ढाले, डी.डी. बाविस्कर, माझे मित्र साहेबराव पानपाटील हे सर्वजण काळाच्या पडद्याआड गेले आहेत. त्याचे साक्षीदार असलेले माझे जुने मित्र विनायक केदारे, उत्तम बनसोडे, व वसंत साळवे हे आजही हयात आहेत.

**–अरुण निकम**
**९३२३२४९४८७,८४५९५०४३१७.**

# बा, तथागता! : अहिराणी भाषेतील साहित्यिक अविष्काराचा एक अमूल्य ठेवा

साहित्य हा समाजाचा आरसा मानला जातो. ते समकालीन समाज व्यवस्थेचे ऐतिहासिक दस्तऐवजच असते. समाजातील सांस्कृतिक मूल्य टिकविण्यासोबतच, सत्य, सौंदर्य, दांभिकता व संघर्ष यांचे प्रतिबिंब ज्या साहित्यकृतीतून उमटतं तेच खऱ्या अर्थाने कालातीत व दर्जेदार साहित्य ठरतं. केवळ मनोरंजनापुरते साहित्य टिकत नाही; तर ते समाजाचे प्रबोधन घडवून शिक्षकत्व स्वीकारणारं असावं. म्हणूनच कालिदास, विल्यम शेक्सपियर, गटे, तेंडुलकर, गिरीश कर्नाड यांसारख्या साहित्यिकांची साहित्यकृती काळाच्या व भौगोलिक सीमारेषांपलीकडे जाऊन जगभर वाचल्या जातात. याच परंपरेत म. सु. पगारे लिखित बा, तथागता! हा कवितासंग्रह येतो. म. सु. पगारे यांचा बा, तथागता! हा काव्यसंग्रह मे २०२५ मध्ये प्रथम मराठीत प्रकाशित झाला. प्रकाशनानंतर त्याचा अनेक भाषांत अनुवाद झाला. मूळ मराठीतील हा ग्रंथ वा. ना. आंधळे यांनी त्याचा अहिराणी भाषेत अनुवाद करून खानदेशी साहित्यविश्वाला नवे सौंदर्याचं कोंदण प्राप्त करून दिले आहे. गौतम बुद्ध व त्यांच्या तत्त्वज्ञानावर आधारलेला अहिराणीतील कदाचित हा पहिलाच काव्यसंग्रह असावा. सदर काव्यसंग्रह हा अस्खलित अहिराणीत असल्याने अहिराणी भाषेलाही एक वलय त्यामुळे प्राप्त झालं आहे, असं म्हणणं अतिशयोक्ती ठरणार नाही.अहिराणीत मौखिक वाङ्मय हे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असलं तरी लिखित स्वरूपात फारच कमी ग्रंथसंपदा अहिराणीत पाहायला मिळते. अहिराणी या शब्दाची संधी 'अहिर + वाणी' अशी करता येऊ शकते. पूर्वी खानदेशवर 'अभीर' म्हणजेच 'अहिर' लोकांचं राज्य होतं. आजही चोपडा तालुक्यातील चौगाव गावाजवळ असणारा 'गवळीवाडा' व बऱ्हाणपुर इथला 'अभिरगड' त्याची साक्ष देतात. या अहिर लोकांची भाषा म्हणजे अहिराणी. अहिराणी ही जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिकच्या काही भाग ज्याला खानदेश म्हणतात तिथे बोलली जाणारी खानदेशी बोली आहे. पूर्वी ही बोली ग्रामीण व अशिक्षितांची भाषा म्हणून हिणवली जात होती; मात्र अलीकडील काळात फुला बागूल, संजीव गिरासे, बापुसाहेब हटकर यांसारख्या साहित्यिकांनी अहिराणीला वैश्विक पातळीवर नेऊन तिचे भाषिक सौंदर्य व सांस्कृतिक मूल्य सिद्ध केले आहे. आणि आज मराठी सोबतच अहिराणीत अनेक साहित्यकृती प्रसिद्ध होऊ लागल्या आणि वाचकांचा त्याला अभिनव असा प्रतिसाद लागू लागला. अहिराणी साहित्य संमेलनालाही अभूतपूर्व असा प्रतिसाद लाभु लागला लागला. काळाच्या पडद्याआड जाऊ पाहणाऱ्या अहिराणी जात्यावरच्या ओव्या या संबंध महाराष्ट्रातील रसिक श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेऊ लागल्या आहेत. अहिराणीतील गीतांनी व जात्यावरच्या ओव्यांनी युट्युब, फेसबुक, इंस्टाग्राम सारख्या समाज माध्यमांवरही आपला अमिट असा ठसा उमटवला आहे व त्या जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन काना कानांमध्ये गुंजन घालत आहेत.अहिराणीत वाचताना तिचं भाषिक सौंदर्य हे वाचक रसिकांना सौंदर्य समीक्षा विषयक एक वेगळीच अनुभूती देऊन जातो. तीच अनुभूती बा, तथागता! हा अहिराणी काव्यसंग्रह असताना वाचकाला मिळत असते. बा, तथागता! च्या पहिल्या विभागात कवी सर्वसामान्य माणसाशी




संवाद साधत सामाजिक विसंगती, धार्मिक अंधश्रद्धा व ढोंगीपणावर प्रहार करतो. तसेच देवाच्या दलालांवरही शाब्दिक प्रहार करतो. परमेश्वराच्या दलालांनी सर्वसामान्य माणसाला परमेश्वराबद्दल मनात भीती घालून अंधश्रद्धा व वाईट रूढी परंपरांच्या खाडीत कसं लोटलं हे अतिशय सुंदर, समर्पक व विलोभनीय पद्धतीने मांडलेलं आहे. ग्रंथाच्या दुसऱ्या विभागात कवी तथागतांचे धम्म, शील, करुणा व मैत्री या तत्त्वांचे प्रतिपादन करता-करता त्याचं जीवनपट रेखाटतो. सर्व राजवैभवी सुख हात जोडून उभे असतानाही सिद्धार्थ आपला खऱ्या अर्थाचा पुरुषार्थ सिद्ध करण्यासाठी परम व खऱ्या सुखाच्या शोधात घराबाहेर पडतो व समग्र मानव जातीच्या उत्थानासाठी अखंड आयुष्य समर्पित करतो, याचा सुंदर व समर्पक विवेचन काव्यात्मक भाषेत कवीने मांडलं आहे. सिद्धार्थच्या या धारिष्ट्याला वडील शुद्धधन, आई महाप्रजापती, पत्नी यशोधरा व मुलगा राहुल यांची संमतीपूर्वक साथ लाभते; सर्व सुखाचा त्याग करून सिद्धार्थ मानव जातीला अहिंसा, सत्य, शील, करुणा, इ. गोष्टींची शिकवण देऊन खरा सुखाचा व जगण्याचा मार्ग दाखवतो व बुद्ध होतो, या सर्व गोष्टी काव्यग्रंथात अतिशय समर्पक व अलंकारिक भाषेत व कौशल्यपूर्ण मांडण्याचे कसब कवीने दाखविले आहे. सोबतच समाजातील अनिष्ट चालीरुढींवर कवी हल्लाबोल करतो. तर तिसऱ्या विभागात भगवान बुद्धांच्या तत्त्वज्ञानावर स्वतःचे मत प्रकट करताना तथागतांचे तत्त्वज्ञान अखंड मानव जातीला कशा पद्धतीने उन्नतीकडे व प्रकाशाकडे नेणारं आहे, ते उत्कृष्ट काव्य शैलीत मांडतो. हा काव्यसंग्रह नुसता तथागतांच्या तत्त्वज्ञानाचा लेखाजोखा मानणारा नसून अहिराणी भाषेतील एक सुंदर साहित्यिक अविष्कार आहे. अस्सल अहिरणीतील इतका सुंदर आणि मोठा काव्यसंग्रह हा कदाचित प्रथमतःच लिहिला गेला असावा. बा, तथागता! हा ग्रंथ फक्त तथागतांचे तत्त्वज्ञान सांगणारा नसून समाजातील अंधश्रद्धा, ढोंगीपणा, दांभिकता व धार्मिक दलालांच्या स्वार्थी कारस्थानांवर प्रखर हल्ला करणारा तर आहेच आहे, परंतु अहिराणी भाषेचा सुंदर पद्धतीने वापर केला गेल्याची उत्कृष्ट साहित्यकृती आहे. बोधिसत्व गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानच समाजाला खऱ्या अर्थाने समाजाला दुःखाकडून सुखाकडे, तिमिरातून तेजाकडे आणि शाश्वत विकासाकडे नेणारं आहे असं वाचकाचं सहज लक्षात येतं. एखादी साहित्य कृती दुसऱ्या भाषेत अनुवादित करत असताना तिच्यात अनेक दोष राहण्याची दाट शक्यता असते. एखाद्या ग्रंथाचा अनुवाद करताना शब्दानुवाद व अर्थानुवाद हा बऱ्याचदा अनुवादकास शक्य होतो. परंतु भावनानुवाद करताना मात्र अनुवादकाची कसोटी लागत असते. कारण एका भाषेतील दुसऱ्या भाषेत असणारा समानार्थी शब्द सापडणं किंवा मग त्याचा अर्थ लावणं हे तसं शक्य होतं. पण त्यात दळलेली नेमकी भावना उलगडणं, हे तसं उघडत असतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, अहिराणी भाषेवर सर्वांना स्वीकृत ठरेल असा अजून तरी कुठलाही व्याकरणाचा ग्रंथ आलेला नाही. अजूनही अहिराणी भाषेचे व्याकरण कोणीही अचूक अशा सिद्धांतिक रुपात मांडलेले नाही. त्यामुळे अहिराणीत लेखन करताना व्याकरणाचे नियम वापरताना लेखकाची बरीच तारांबळ उडण्याची दाट शक्यता असते.

अहिराणीचा दर्जेदार असा शब्दकोशही अजून पहावयास मिळत नाही. अशाही अवस्थेत वा, ना. आंधळे यांनी बा, तथागता! हा काव्यसंग्रह अहिरणीत अनुवादित केला, ही बाब शिवधनुष्य पेलण्या इतकीच दिव्य आहे. ग्रंथाचे वाचन करत असताना काव्यरसिकास एक गोष्ट आवर्जून जाणवते. ती म्हणजे वा. ना. आंधळे यांनी सदर ग्रंथाचे अनुवादन करताना कुठल्याही प्रकारच्या सामाजिक व साहित्यिक मूल्यांचा ऱ्हास होऊ दिलेला नाही. एखाद्या ग्रंथाचं अनुवाद करताना तसं होण्याची दाट शक्यता असते. परंतु त्या समस्येवर आंधळे यांनी लिलया मात केलेली दिसते. अनुवाद करताना शब्दांचा, अर्थांचा व भावनांचा योग्य व समर्पक असा अनुवाद केल्याची अनुभूती येत असते. तसेच ज्या जागी जे अहिराणी शब्द हवेत तेच नेमकेपणाने त्यांनी हेरले आहेत. त्याचं उदाहरण खालील काही काव्यपंक्तीतून वाचकांचे सहज लक्षात येईल:

पलघडी आथायी तथा
तथायी आथा
धुंडत ऱ्हायना... सोताले
धरम धरम्हा
(पा. नं. २१)

या काव्यपंक्तीतील 'ऱ्हायना', 'आथायी तथा/ तथायी आथा' तसेच,

गंजचसावा आसंबी जास घडत
की,
गर्वेस्ना थर
जातंस चढत
आन
ऱ्हातस सडत
बुद्धिवानना मेंदूवऱ्हे (मगजवऱ्हे)
ह (पा. नं. २०२)

या काव्यपंक्तीत 'गंजचसावा', व 'मगजवऱ्हे' हे शब्द अस्सल अहिराणी आहेत व त्यांचा उपयोग अनुवादकाने अतिशय समर्पकपणे व नेमकेपणाने केला आहे. याव्यतिरिक्त कवितेत 'गलेपते', 'फाकाडो', 'ठायका', 'डेडोर', इ. अनेक अहिराणी शब्दांचा अतिशय समर्पक व कौशल्यपूर्वक वापर केलेला दिसतो. हे अस्सल अहिराणी शब्द निश्चितच कवितेला खरा अहिराणी व सोबतच ग्रामीण बाज बहाल करतात.

मराठी भाषेत येणारे काही अक्षरे वा ध्वनी हे अहिराणीत नसतात. याची काही उदाहरणे घ्यायची झाल्यास – 'ळ' व 'ण' हे ध्वनी. मराठीतील 'ळ' चा अहिराणीत 'य' होतो व 'ण'चा 'न' होतो. उदा. जळगाव- जयगाव, धुळे-धुये, अमळनेर-अमयनेर, इ. वा. ना. आंधळे यांनी मराठीतील असे शब्द अहिराणीत अनुवाद करताना हे सर्व नियम कौशल्यपूर्वकपणे व तंतोतंतपणे पाळलेले दिसतात. बा, तथागता! मध्ये आलेले अशी काही उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील – 'गोळा-गोया', 'साकळी-साकयी', 'माणूस-मानूस', 'जपणूक-जपनूक', 'टाकणारा-टाकनारा', 'गयबाणी- गयबानी' , इ. याचा प्रत्यय दुसऱ्या भागातील शेवटच्या काव्यपंक्ती:

बुद्धं शरनम गच्छामि
धम्मं शरनम गच्छामि
संघं शरनम गच्छामि (पा. नं. १८४)

यामध्ये चांगल्या प्रकारे येतो.

अशा प्रकारे बा, तथागता! हा कवितासंग्रह समाजातील दांभिकतेवर प्रखर हल्ला करताना मानवतेचे व करुणेचे तत्त्वज्ञान पुढे आणतो. अहिराणी भाषेच्या सौंदर्यामुळे हा संग्रह वाचकांच्या मनाला नवा अनुभव देतो. अनुवादक वा. ना. आंधळे यांनी काव्याच्या आशयाशी प्रामाणिक राहून भाषेचा गोडवा जपला आहे. हा ग्रंथ केवळ काव्यसंग्रह न राहता सामाजिक जागृतीचा दस्तऐवज ठरतो.

**– प्रा. डॉ. विजय शिरसाठ**
**चाळीसगाव**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक रतन नामदेव साळवे यांनी सोलापूर तरूण भारत मिडिया लि., प्लॉट नं. १/३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को. ऑप सोसायटी लि. एमआयडीसी, रेल्वे स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र- ४३१००१) येथे छापून एफ-४/ १४, अयोध्या नगर, एन -७, सिडको छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र- ४३१००१) येथे प्रसिद्ध केले. * संपादक : रतन नामदेव साळवे, मो. ९९२३५०२३२०, E-nilepratik02@gmail.com

# 'मूकनायक' पुरस्काराचे ६ फेब्रुवारीला वितरण

## २०२६ चा मूकनायक पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे यांना जाहीर

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

शाक्यमुनि प्रतिष्ठान, बीडच्या वतीने दिला जाणारा 'मूकनायक' राज्यस्तरीय पुरस्कार (२०२६) यंदा ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे (कोपरी जि.ठाणे) यांना जाहीर झाला आहे. ६ फेब्रुवारी रोजी 'मूकनायक दिना'निमित्त आयोजित कार्यक्रमात या पुरस्काराचे थाटात वितरण केले जाणार आहे.खोकडपुरा भागातील सामाजिक न्याय भवनाच्या सभागृहात शुक्रवारी ६ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता 'मूकनायक दिनाचे' आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाक्यमुनि प्रतिष्ठान, बीडचे अध्यक्ष प्रा.शरद वंजारे यांची उपस्थिती राहणार आहे. तर नाशिकच्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा.डॉ.सुधीर गव्हाणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता एस.एस. भगत, कर्करोग महाविद्यालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड, नालंदा फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे आणि समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त रविंद्र शिंदे यांची उपस्थिती राहणार आहे. यावेळी शाक्यमुनि प्रतिष्ठान, बीडच्या वतीने दिला जाणारा 'मूकनायक' राज्यस्तरीय पुरस्कार (२०२६) ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे (कोपरी जि.ठाणे) यांना प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. रोख २५ हजार रुपये, सन्मानपत्र आणि सन्मान चिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन उपाध्यक्ष प्रा. अंकूश कोरडे, मॉडर्न महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. नामदेव सानप, संतोष प्रधान यांनी केले आहे.

**मधु कांबळे यांचा थोडक्यात परिचय**

१ जून १९६१ मध्ये हरोली, ता. कवठे महंकाळ, जिल्हा सांगली इथे मधु कांबळे यांचा जन्म झाला. त्यांचं मुंबई विद्यापीठ इथे एम.ए. (राज्यशास्त्र) शिक्षण झालं. फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीत त्यांनी विद्यार्थी संघटनांच्या माध्यमातून सहभाग घेतला होता. श्री साप्ताहिकामधून प्रशिक्षणार्थी पत्रकार म्हणून १९८९-९० च्या दरम्यान त्यांनी काम केलं. त्यानंतर साप्ताहिक चित्रलेखा, दैनिक सकाळमधून राजकीय, सामाजिक, कामगारांच्या प्रश्नांवर त्यांनी लेखन केलं. त्यानंतर मुंबई सकाळमधून त्यांनी १९९१ पासून पूर्णवेळ पत्रकारितेस सुरुवात केली. २० वर्ष मुंबई सकाळमध्ये त्यांनी राजकीय, सामाजिक विषयावर लेखन केले. त्यानंतर २०११ पासून दैनिक लोकसत्तामध्ये राजकीय पत्रकार म्हणून काम पाहिले. लोकसत्तामधून ते १ जून २०२४ रोजी निवृत्त झाले. मधु कांबळे यांच्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ पत्रकारितेच्या काळात त्यांनी विविध सामाजिक प्रश्नांवर सडेतोड लिखान केले. त्यांच्या अनेक बातम्यांची दखल राज्य शासनाला घेऊन आपल्या धोरणात बदल करावा लागला.



**मधू कांबळे यांना त्यांच्या कार्यासाठी मिळालेले पुरस्कार**

२००० मध्ये मुंबई मराठी पत्रकार संघाचा कॉ. तु. कृ. सरमळकर स्मृती पुरस्कार
२०१३ मध्ये कॉ. नरेंद्र (नाना) मालुसरे चॅरिटेबल संस्थेचा 'उत्कृष्ट पत्रकारिता दीपस्तंभ' पुरस्कार
२०१६ मध्ये पत्रकार वरुणराज भिडे स्मृती पुरस्कार
२०१९ मध्ये महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मूकनायक पत्रकारिता पुरस्कार
२०२४ मध्ये 'पत्रकार दिनू रणदिवे स्मृती' प्रतिर्थ 'पत्रकार दिनू रणदिवे स्मृती पुरस्कार'

**मधु कांबळे यांची पत्रकारिता क्षेत्रातील ठळक कामगिरी**

मधू कांबळे यांची १९९१ मध्ये मुंबईतील संक्रमण शिबिरात राहणाऱ्या रहिवाशांच्या व्यथा मांडणारी वृत्तमालिका 'नको जिणे संक्रमण शिबिरातले' तुफान गाजली होती. १९८१ मध्ये त्यांच्या एका वृत्तमालिकेची दखल शासनाकडूनही घेण्यात आली होती. सरकारने खासगी सुरक्षा रक्षकांना संरक्षण देणारा कायदा केला. मात्र त्याची अंमलबजावणी योग्यरित्या होत नसल्याने सुरक्षा रक्षकांची व्यथा मांडणारी त्यांची वृत्तमालिका गाजली होती. जव्हार, मोखाडा या आदिवासी भागात १९९६-९७ या काळात साथीच्या रोगाने थैमान घातलं होतं. त्यावेळी त्या भागातील आरोग्य सुविधांचा अभाव, आदिवासी समाजाची गरिबी, अतिशय असंवेदनशील शासकीय यंत्रणा, अंधश्रद्धा यावर प्रकाश टाकणारी वृत्तमालिका दैनिक सकाळमध्ये प्रकाशित झाल्यानंतर चांगलीच गाजली होती.२०११-२०२४ या काळातील दैनिक लोकसत्तामधील मधू कांबळे यांची महत्त्वपूर्ण कामगिरी-मधू कांबळे यांनी प्रसिद्ध केलेल्या एका वृत्तमालिकेमुळे शासनाला दखल घेत त्यांच्या धोरणात काही प्रमाणात बदल कराला लागला होता. ही वृत्तमालिका होती टोल धोरणाची. माहिती अधिकार कायद्यातून त्यांना महाराष्ट्रभरात प्रत्यक्ष पथ कर वसुलीचा कालावधी आणि कंत्राटदारांची वसूल झालेली रक्कम, ठरल्यापेक्षा अधिक रक्कम घेतल्याचे समोर आले होते. महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटदारधार्जिण्या टोल धोरणाची समिक्षा करणारी वृत्तमालिका गाजली होती. मधु कांबळे यांच्या बातमीद्वारे महाराष्ट्रातील एका जिल्ह्यातील मूकबधीर मुलीवर अत्याचार झाल्याची घटना उघड झाली होती. तत्कालीन मुख्यमंत्र्यांकडून या बातमीची, या प्रकरणाची दखल घेत त्या मूकबधीर मुलीच्या बाजूने सरकारकडून एका सरकारी वकिलाची नेमणूक करुन तरुणीला न्याय देण्यात आला होता. या प्रकरणात आरोपीला जन्मठेपीची शिक्षा सुनावण्यात आली होती. महाराष्ट्रात कंत्राटदारांकडून केल्या जाणाऱ्या आदिवासी महिलांच्या शोषणाला वाचा फोडण्याचं काम मधु कांबळे यांच्या बातमीद्वारे करण्यात आलं होते. शासनाने याची दखल घेत पोलीस अधिक्षकांकडे चौकशी सोपावत शासनाकडे चौकशी अहवाल सादर करण्यात आला होता. २०१३ मध्ये सामाजिक आरक्षणाशिवाय खासगी विद्यापीठ विधेयक घाईत विधिमंडळात मंजूर करुन घेण्यात आले होतें. त्यावर त्यांनी सविस्तर लेख लिहिला होता. २००४ मध्ये केवळ कायद्याने मान्यता दिलेल्या शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण लागू राहील, अशी तरतूद आहे. त्याच कायद्याला छेद देणारा विधिमंडळात आरक्षण नाकारणारा दुसरा कायदा करण्यात आला. एकाच विधामंडळात आरक्षण देणारे आणि आरक्षण नाकारणारे असे पस्परविरोधी कायदे कसे काय होऊ शकतात, असा प्रश्न लेखाद्वारे उपस्थित केला. लेखाची राज्यपालांकडून दखल घेत आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करण्यास शासनाला पत्र पाठवण्यात आले होते. शासनाला त्यावर समर्पक खुलासा करता आला नाही. शेवटी ज्या विधिमंडळात खासगी विद्यापीठ कायदा मंजूर केला होता, त्याच विधिमंडळात सरकारने ते विधेयक मागे घेत असल्याचा प्रस्ताव मांडून मंजूर करुन घेतला. विधिमंडळाने मंजूर केलेला कायदा विधिमंडळातच मागे घेण्याची सरकारवर नामुष्की आली. विधिमंडळाच्या इतिहासातील कदाचित ही दुर्मिळ घटना असेल. त्याचा दुसरा परिणाम म्हणजे नंतर विधिमंडळात जे खासगी विद्यापीठ विधेयके मंजूर केली जातात त्यात सामाजिक आरक्षणाची तरतूद केली जाते, नव्हे ती बंधनकारक करण्यात आली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अप्रकाशित साहित्य शासन प्रकाशित करते. परंतु अलीकडे तीन-चार वर्षात अत्यंत संथगतीने छपाई सुरु होती. मागणी प्रचंड असताना पुस्तके मिळत नव्हती. विशेष म्हणजे ४ कोटी रुपयांचा कागद खरेदी केला होता, तो धूळ खात पडला होता, परंतु पुस्तक छापाईसाठी त्याचा वापर केला जात नव्हता. त्यावर प्रकाश टाकणारे वृत्त त्यांनी प्रकाशित केलं होतं. ती बातमी मुंबई उच्च न्यायालयाने सो मोटो जनहित याचिका म्हणून दाखल करुन घेतली. बाबासाहेबांच्या साहित्याच्या प्रकाशनाबद्दल जी दिरंगाई चालवली होती, त्याबद्दल शासनाची कानउघाडणी केली. त्यानंतर वेगाने पुस्तकांची छपाई सुरु झाली. हा त्या बातमीचा झालेला एक चांगला परिणाम होता.

राज्य सरकारने २०१५-१६ दरम्यान राजद्रोह किंवा देशद्रोहाबद्दल गुन्हे दाखल करणं आणि अंतर्गत सुरक्षासंबंधी कायदा करण्याचा निर्णय घेतला. भारतीय दंड संहितेतील कढउ कलम १२४ (ए) ची मोडतोड करुन, राजकारण्यांवर टीका केली तरी, देशद्रोहाचा गुन्हा दाखल होणार, असं परिपत्रक गृह विभागाने जारी केलं होतं. ते पत्रक पहिल्यांदा प्रकाशात आणून त्यावर बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्या बातमीने खळबळ उडाली होती. सर्व माध्यमांनी तो विषय उचलून धरला. शेवटी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देशद्रोहासंबंधीचे परिपत्रकात रद्द करण्यात येत असल्याचं जाहीर केलं. अंतर्गत सुरक्षा कायद्याचा मसुदा सरकारने जाहीर केला. त्यात राज्य घटनेने दिलेल्या संघटना स्वातंर्त्याच्या मूलभूत अधिकारावरच गदा आणली होती. त्यालाही वाचा फोटली. त्यानंतर तो विषयही नंतर इतर माध्यमांनी उचलून धरला. शेवटी तो प्रस्तावित कायदा आणि त्याचा मसुदा रद्द करण्यात आला.

अलिकडच्या काळात भारतीय समाजात सामाजिक तणाव आणि अस्वस्थता वाढवणाऱ्या ३ प्रमुख गोष्टी आहेत. आरक्षण, ट्रॉसिटी आणि जातीय व्यवस्थेतून होणारे जातीय अत्याचार. त्यामुळे स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही आपण संविधानाला अभिप्रेत असलेल्या सामाजिक समतेपापून दूर जात आहोत. त्यावर केलेला अभ्यास आणि चिंतनातून लोकसत्तामध्ये समाजमंथन नावाचं स्तंभ लेखन त्यांनी केलं. आरक्षणाला पर्याय, ट्रॉसिटी कायद्याची व्याप्ती आणि जाती व्यवस्थेचे आधार नष्ट करणं, यावर चिंतनात्मक लेख त्यांनी लिहिले. त्याचा थोडा विस्तार करुन 'समतेशी करार' हे पुस्तक प्रकाशित झाले.

# जेफ्री एपस्टीन यांच्या जाळ्यात अडकलेले मासे

जेफ्री एपस्टीनच्या डायरीने जागतिक पातळीवर मोठे वादळ निर्माण केले आहे. ते थांबता थांबत नाही अशी परिस्थिती आहे याचे कारण एपस्टीनच्या मृत्यूनंतर त्याने डायरीत ज्या नोंदी करून ठेवल्या आहेत, त्यात राजकारणी, राजघराण्यातील सदस्य, सेलिब्रिटीज आणि अब्जाधीश अशा अनेक प्रभावशाली व्यक्तींशी संबंध हे आहे. जेफ्री एपस्टीन हा एक प्रभावशाली अमेरिकन अर्थतज्ज्ञ ( फायनान्शियर) होता. अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषण आणि मानवी तस्करीच्या प्रकरणांमुळे आधुनिक इतिहासातील सर्वात कुख्यात व्यक्तींपैकी हा एक ठरला. त्याचे प्रकरण हे केवळ त्याच्या गुन्ह्यांमुळे नव्हे तर त्याच्याशी संबंधित असलेल्या शक्तीशाली लोकांमुळे संपूर्ण लक्ष वेधून घेणारे ठरले.२००८ साली एपस्टीनवर एका अल्पवयीन मुलीसोबत लैंगिक संबंध ठेवल्याचा आरोप ठेवण्यात आला होता. मात्र त्याला मिळालेल्या ' प्लिया डीक ' या करारामुळे तो कठोर शिक्षेपासून वाचला. एपस्टीनला सुरुवातीपासूनच उच्चभ्रू संरक्षण मिळत असणाऱ्या शंका व्यक्त केल्या गेल्या. २०१९ मध्ये अमेरिकन फेडरल अधिकाऱ्यांनी त्याला पुन्हा अल्पवयीन मुलींच्या लैंगिक तस्करीच्या आरोपाखाली अटक केली. मात्र खटला सुरू होण्यापूर्वीच त्याचा तुरूंगात मृत्यू झाला.

२०२४ ते २०२६ दरम्यान मोठ्या प्रमाणात न्यायालयीन आणि तपासाशी संबंधित कागदपत्रे सार्वजनिक करण्यात आली. हे अमेरिकन न्यायव्यवस्थेचे फलित होय, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. न्यायालयीन तपासाशी कागदपत्रे यालाच ' एपस्टीन फाइल्स ' असे संबोधले जाते. या फाइल्समधील कागदपत्रामध्ये जगातील प्रभावशाली व्यक्तींशी सामाजिक किंवा व्यावसायिक कारणातून एपस्टीनचा संपर्क असल्याच्या नोंदी आहेत.

प्रिन्स न्ड्रयू ( युके) हे नागरी खटल्यात सामोरे गेले आणि तडजोड करून प्रकरण मिटवले. बिल क्लिंटन, डोनाल्ड ट्रंप, अनेक कलाकार, उद्योगपती आणि राजकारणी हे संपर्क किंवा ओळखीच्या स्वरूपात नमूद झाले आहेत. २०२६ च्या सुरुवातीला एपस्टीनशी संबंधित कागदपत्रावर आधारित ऑनलाईन चर्चामध्ये भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे नाव चर्चेत आले. विरोधी पक्ष सरकारला विचारत आहेत की, नरेंद्र मोदी २०१७ मध्ये अमेरिकेला गेले. तेथे एपस्टीनची भेट झाली. एपस्टीन यांनी मोदींना सल्ला दिला. तो सल्ला घेऊन नरेंद्र मोदी इज्राईला गेले. व तेथे नाचू व गाऊ लागले. २०१९ मध्ये नरेंद्र मोदी प्रधानमंत्री बनल्यानंतर पुन्हा अमेरिकेत गेले व मोदी व एपस्टीनची भेट झाली. याचा खुलासा करावा. पण सत्ताधारी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचे पाहावयास मिळते.जेफ्री एपस्टीन अमेरिकेत फायनान्शियर होते तो पर्यंत ठीक होते, पण जेव्हा अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषण व मानवी तस्करीचा गुन्हेगार म्हणून प्रमाण झाले अशावेळेस प्रभावशाली राजकीय व्यक्तींचा कोणत्या न कोणत्या स्वरूपातील सहभाग शंका उपस्थित करते. आणि ते स्वाभाविक आहे. एपस्टीन प्रकरण हे दाखवते की सत्ता, पैसा आणि प्रभाव हे न्यायप्रक्रियेला कसा अडथळा निर्माण करू शकतो. तसेच सत्य आणि अफवा यातील फरक ओळखण्याचे महत्व अधोरेखित करते.

**-प्रा. डॉ.केशव मेंढे,नागपूर**

# 'मिशन रेबीज' अंतर्गत महाराष्ट्र हिंदी विद्यालयात पशुसंवर्धन विभागाचा जनजागृतीपर उपक्रम

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

शहागंज येथील महाराष्ट्र हिंदी विद्यालयामध्ये आज दिनांक ३ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पशुसंवर्धन विभाग व विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन रेबीज' अंतर्गत पाळीव व भटक्या प्राण्यांच्या आरोग्य, सुरक्षितता व मानवी आरोग्य संरक्षणाबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक रवींद्र तायडे, पर्यवेक्षक योगेश्वर निकम यांच्या विशेष पुढाकाराने करण्यात आले.या कार्यक्रमात पशुसंवर्धन तज्ज्ञ आकाश बेडवाल यांनी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांना मार्गदर्शन करताना पाळीव प्राण्यांचे नियमित लसीकरण किती आवश्यक आहे, याचे शास्त्रीय महत्त्व स्पष्ट केले. प्राण्यांना योग्य व संतुलित पौष्टिक आहार, स्वच्छ व शुद्ध पिण्याचे पाणी, तसेच सुरक्षित व स्वच्छ निवाऱ्याची गरज याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.यावेळी त्यांनी रेबीज हा प्राणघातक आजार कसा पसरतो, त्याचे स्वरूप काय आहे, तसेच प्राण्यांमध्ये आढळणारी संभाव्य लक्षणे जसे- अचानक चिडचिडेपणा, आक्रमक वर्तन,




तोंडातून लाळ गळणे, अन्न-पाणी न घेणे आदी लक्षणांबाबत सविस्तर विवेचन केले. विशेषतः श्वान चावल्यास तात्काळ कोणती काळजी घ्यावी, जखम साबण व स्वच्छ पाण्याने कशी धुवावी, वेळ न दवडता नजीकच्या सरकारी आरोग्य केंद्रात जाऊन उपचार व लस का घ्यावी, याबाबत त्यांनी अत्यंत उपयुक्त मार्गदर्शन केले.तसेच श्वान चावण्यापासून बचावासाठी घ्यावयाच्या उपाययोजना, अनोळखी किंवा चिडलेल्या प्राण्यांपासून सुरक्षित अंतर राखणे, प्राण्यांना छेडू नये, तसेच भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी लसीकरण व निर्बिजीकरणाचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.


हा कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये मानवी व पशु आरोग्य यांचा परस्पर संबंध, प्राण्यांबद्दलची संवेदनशीलता व सामाजिक जबाबदारी निर्माण करणारा ठरला. 'मिशन रेबीज'सारख्या उपक्रमामुळे समाजात रेबीजविषयी जागरूकता वाढून रेबीजमुक्त समाज निर्मितीला चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन गोविंद गायकवाड यांनी केले कार्यक्रमास विद्यालयाचे शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच श्वानप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करून अशा जनजागृतीपर कार्यक्रमांचे सातत्य राखण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी लोकनाथ यशवंत

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी-**

विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने नांदेड येथे आयोजित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवी,लेखक, अनुवादक लोकनाथ यशवंत(नागपूर) यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती आज आयोजित पत्रकार परिषदेत विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी व स्वागताध्यक्ष राहुल एस एम प्रधान (नांदेड) यांनी दिली. हे संमेलन दि. २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ रोजी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज मैदानावर संपन्न होणार आहे. कवी लोकनाथ यशवंत हे १९ व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलन (छ.संभाजी नगर) अध्यक्ष डॉ.अशोक राणा (यवतमाळ) यांच्याकडून सूत्रे हाती घेतील.

विद्रोही सांस्कृतिक चळवळ जीवनाच्या सर्व क्षेत्रात समतेचा पुरस्कार करते. तुमच्या ग्रंथांमध्ये अखिल मानवाचे हित होईल याचे बीज नाहीअसे म्हणत म.जोतिराव फुले यांनी उंटावरून शेळ्या वळणाऱ्या घालमोड्या दादांच्या संमेलनास विरोध केला होता.तीच मराठी साहित्य संमेलने आता विषमतावादी सांस्कृतिक राजकारणाचे मुखंड बनली आहेत. म्हणूनच विद्रोही चळवळीच्या वतीने १९९९ पासून महाराष्ट्रात मुंबई (धारावी), कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, सोलापूर, नंदुरबार,वाशी, पुणे, मनमाड,धुळे,नाशिक,परभणी, बुलढाणा,हिंगोली, उदगीर,नाशिक, वर्धा,अमळनेर,छ. संभाजी नगर (औरंगाबाद) इ. ठिकाणी १९ साहित्य संमेलने तसेच १ आंतरराज्य (निपाणी) व १ विद्रोही स्त्री साहित्य संमेलन, पुणे यशस्वीपणे आयोजित करण्यात आले आहेत. कालकथित बाबुराव बागुल, वाहरु सोनवणे,डॉ. यशवंत मनोहर,डॉ. अजिज नदाफ, आत्माराम कनीराम राठोड,कॉ. तारा रेड्डी, तुळसी परब, डॉ.आ.ह. साळुंखे, संजय पवार, जयंत पवार, उर्मिला पवार,डॉ.श्रीराम गुंदेकर, डॉ. प्रतिभा अहिरे, विमल मोरे, डॉ. प्रल्हाद लुलेकर, डॉ. आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे, डॉ.वासुदेव मुलाटे, डॉ. अशोक राणा यांसारख्या सर्जनशील साहित्यिक, समीक्षक,अनुवादक, पत्रकार, इतिहासकार,नाटककार यांनी विद्रोही साहित्य संमेलनाची अध्यक्षपदे भूषवली आहेत.पत्रकार परिषदेत बोलताना विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्षा प्रा. प्रतिमा परदेशी यांनी सांगितले की, दलित, पीडित आणि शोषितांच्या वेदनांना मराठी कवितेच्या केंद्रस्थानी आणणाऱ्या कवींच्या परंपरेत लोकनाथ यशवंत अग्रभागी आहेत. सलग पाच दशके ते कविता लिहिताहेत.त्यांच्या कवितेमुळे मराठी कवितेचा सामाजिक व वैचारिक चेहरा अमुलाग्र बदलला. लोकनाथ यशवंत यांच्या कवितेला विवेकनिष्ठ परिवर्तनाची वैश्विक आस आहे. त्यांची कविता परंपरेला विधायक नकार देत क्रांतिकारी सामाजिक व सांस्कृतिक जाणीवेच्या आधारावर मानवतेचा सत्याग्रही ध्येयवाद व्यक्त करते, असेही प्रा. परदेशी यांनी यावेळी नमूद केले. त्यांच्या कवितेतील उपरोध व आत्मटीका ही शैली सत्तेच्या दमनकारी यंत्रणेविरोधात प्रखर भूमिका मांडणारी आहे. विसाव्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी निवड करण्यात आलेले कवी लोकनाथ यशवंत हे समकालीन मराठी कवितेतील महत्त्वाचे नाव असून 'आता होऊन जाऊ द्या !', 'आणि शेवटी काय झाले?', 'पुन्हा चाल करू या', 'बाकी सर्व ठीक आहे', 'हे तर होणार होते हे' त्यांचे ५ कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितांचे हिंदी व इंग्रजी भाषांमध्ये ४ अनुवाद 'ऐलान', 'आखिर क्या हुआ', Broken Man, The Downtrodden या नावाने प्रकाशित झाले आहेत.त्यांच्या कवितांवर ४ नाट्यरूपांतरे - एकपात्री प्रयोग, एकांकिका, नाट्यप्रयोग झाले आहेत.त्यांच्या शेतकरी आत्महत्येच्या पार्श्वभूमी वरील बैल या कवितेवर 'बाईस्कोप' हा मराठी चित्रपट साकारण्यात आला आहे. लोकनाथ यशवंत यांनी स्वतः ४ अनुवाद मन्सूर एजाज जोश, निदा फाजली यांच्या कविता आणि सहादत हसन मंटो यांच्या लघुकथांचे हिंदीतून मराठीत अनुवाद केले आहेत. तर बाबुराव बागुल यांच्या कवितांचा हिंदी अनुवाद देखील त्यांनी केला आहे. त्यांच्या निवडक कवितांचे दोन संग्रह आता आणि पुन्हा... (संपा. इसादास भडके) यशवंत कविता लोकनाथची ( सं.मेघमाला मेश्राम) प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या कविता विविध राज्यातील शिक्षणक्रमात समाविष्ट असून त्यावर विद्यापीठांमध्ये शोधप्रबंधही प्रसिद्ध झाले आहेत. आजच्या विद्वेषी व अघोषित आणीबाणीच्या कालखंडात संविधानिक लोकशाहीवर क्रूर हल्ला होत असताना सत्य व मानवतेसाठी क्रांतीकारी कविता घेऊन मैदानात उभ्या ठाकलेल्या कवी लोकनाथ यशवंत यांच्या निवडीमुळे विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने आयोजित हे विसावे साहित्य संमेलन फुले शाहू आंबेडकर प्रणित समतावादी विचारांना बळ देणारे ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



या पत्रकार परिषदेस नांदेड विसाव्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष राहुल एस एम प्रधान हे आहेत. या पत्रकार परिषदेला विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या राज्याध्यक्ष प्रा. प्रतिमा परदेशी, प्रा.भारत शिरसाठ, एड.वैशाली डोळस,अनंत भवरे हे विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे राज्य पदाधिकारी उपस्थित होते.

# भारताचे संविधानाला अभिप्रेत, दृष्टिकोनयुक्त वर्तमानपत्रे वाचली पाहिजेत-बी.बी.मेश्राम

## मूकनायकच्या १०५ व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय परिसंवाद संपन्न

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने मूकनायकच्या १०५ व्या वर्धापन दिनानिमित्त मूकनायकची प्रासंगिकता, आव्हाने आणि उपाय योजना या विषयावर डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालयात ३१ जानेवारी २०२६ ला परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.परिसंवादात उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायकची जाहिरात केसरीला पाठविली होती, जी त्यांनी छापली नाही. याचा अर्थ प्रस्थापितांच्या मनात किती द्वेष, मत्सर आणि आकस होता? हे सिद्ध होते. अर्थात सामाजिक अभिसरणाला त्यांचा विरोध होता. म्हणूनच मूकनायचा जन्म झाला. त्या माध्यमातून देशभरातील अस्पृश्यांना जागृत केले गेले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, समाजात हजारात नऊ लोक शिकलेले असताना बाबासाहेबांनी मूकनायक चालविले होते तर मग आज ८६ टक्के लोक साक्षर असताना आपण वर्तमानपत्र का चालवू शकत नाही? करिता आपण त्याची मूळ कारणे शोधली पाहिजेत. जेणेकरून बहुजन समाजाच्या उत्थानासाठी सर्वांगीण मीडिया चालविला जाऊ शकेल.




सामाजिक जनमत तयार करण्यासाठी मीडियाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. मीडिया हा जनमत निर्माण करण्याचा कारखाना आहे. आता केवळ बातमीपत्र वाचून चालणार नाही तर भारताचे संविधानाला अभिप्रेत असणारी दृष्टिकोनयुक्त वर्तमानपत्रे वाचली पाहिजेत. जेणेकरून आपणास परिवर्तनवादी महापुरुषांच्या स्वप्नातील आदर्श भारत निर्माण करता येईल. परिणामी भेदभाव युक्त समाजातील ३६ चा आकडा नष्ट होऊन ६३ मध्ये परिवर्तित होऊन शांतताप्रिय मानवतावादी समाज तयार होऊ शकेल. ज्या वर्तमानपत्रात आमच्या सुखदुःखाचा आवाज मांडला जाईल, तोच आमचा मेन्स्ट्रीम मीडिया होय.याप्रसंगी दि ऑल इंडिया नाग असोसिएशनचे चेअरमन डॉ. राजीव कुमार म्हणाले की, जगातील महान लोकशाही पाळणारे भारत हे एक राष्ट्र आहे. सामाजिक व आर्थिक समानता निर्माण केल्यावरच लोकशाहीची अंमलबजावणी केल्यासारखे होईल. करिता समाजाचे समाजभान निर्माण करावे लागेल. दैनिक सार्वभौम राष्ट्रचे संपादक प्रेमरत्न चौकेकर म्हणाले की, छत्रपती शाहू महाराजांनी मूकनायकला २५०० रुपयाची देणगी दिली होती. ज्याची किंमत आज साडेतीन कोटी रुपये इतकी आहे. त्या प्रमाणात किंमत मोजून आपणास देशव्यापी मीडिया निर्माण केला पाहिजे. दामाचे सचिव डॉ. आनंद तारू म्हणाले की, पत्रकारिता ही समाजाची रक्तवाहिनी आहे. एन सी सी डी चे सेवानिवृत्त संयुक्त संचालक डॉ. एल. जे. कान्हेकर म्हणाले की, पेन आणि ब्रेनच्या सहकार्याने मीडिया चालत असतो. निळे प्रतीक चे संपादक रतनकुमार साळवे म्हणाले की, केवळ टीआरपी वाढविण्यासाठी भावनिक मुद्द्याचे राजकारण करून चालणार नाही तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मूल्यवर्धित पत्रकारिता जोपासून समाज जोडावा लागेल. दि ऑल इंडिया नाग असोसिएशनचे महासचिव मयंकराज सिंग म्हणाले की, पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, त्याचे संवर्धन केले पाहिजे. या परिसंवादासाठी तामिळनाडू वरून डॉ. कामराज गणेशण, बेंगलोर वरून डी. आर. आर्या, बिहार वरून डॉ. रघुवीर प्रजापती, सुधीर कुमार, जे एन राम, डॉ. उपेंद्र, दिल्लीवरून आर. के. सिंग, डॉ. रूपचंद गौतम, श्याम नारायण, नागपूर वरून डॉ. चंदू मैस्के, डॉ. एल. जे. कान्हेकर, बिदर वरून महादेव कांबळे अशाप्रकारे विविध सात राज्यातील प्रतिनिधी सह शेकडो स्थानिक हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विलास कटारे तर सूत्रसंचालन ड. विलास रामटेके व आभार प्रा. शिवम गायकवाड यांनी व्यक्त केले. ड. सुनील कुमार नागवंश यांच्या समूहाने उत्कृष्ट प्रबोधनपर गीते सादर केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उद्योजक मिलिंद बागुल, उद्योजक शशिकांत काळे, डॉ. जोगेंद्र पाचगावकर, महादेव डांबरे, ड. राजू बागुल, डॉ. व्ही. एच. कांबळे इत्यादी प्रतिनिधीनी विशेष प्रयत्न केले. असे कळविण्यात आले आहे.

# सुभेदार रामजी आंबेडकर यांच्या ऐतिहासिक स्मृती प्रेरणादायी :प्रकाश सुरमुख

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मायणी । प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घडविणारे त्यांचे वडील सुभेदार रामजी सकपाळ यांच्या मायणीशी संबंधित असलेल्या ऐतिहासिक स्मृती प्रेरणादायी आहेत. त्या जपल्या जाव्यात. असे प्रतिपादन प्रकाश सुरमुख यांनी केले

मायणी पत्रकार संघाच्या वतीने सुभेदार रामजी यांचा ११३ वा स्मृतिदिन येथे साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. मायणी पत्रकार संघाचे अध्यक्ष तानाजी चव्हाण. डॉ. डांगे,अमोल भिसे, कुंदा कांबळे इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते.



श्री. सुरमुख पुढे म्हणाले, सेवानिवृत्तीनंतर सुभेदार रामजी आंबेडकर सातारा येथे पीडब्ल्यूडी खात्यात नोकरीस आले. सन १८९६ च्या सुमारास सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भागात इंग्रज सरकारने तलाव बांधणीची कामे सुरु केली. यामध्ये मायणी तलावाचा समावेश होता. या तलावाच्या देखरेखीचे व पगार वाटपाचे काम सुभेदार रामजी यांच्याकडे होते. त्यामुळे वयाच्या पाचव्या वर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर याच्या बालपणाचे काही दिवस मायणी (ता. खटाव, जि. सातारा) येथे गेले आहेत. चरित्रकार चांगदेव खैरमोडे यांनी लिहिलेल्या चरित्र खंडामध्ये याबाबतची नोंद सापडते. या ऐतिहासिक स्मृती जपल्या जाव्यात म्हणून मायणी मध्ये त्यांचे स्मारक व्हावे . मायणी पत्रकार संघाचे अध्यक्ष तानाजी चव्हाण म्हणाले मायणी येथील हा ब्रिटिशकालीन तलाव फ्लेमिंगो पक्षाचे आश्रयस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. या तलाव परिसरात सुभेदार रामजी आंबेडकर यांच्या ऐतिहासिक स्मृति जपल्या जाव्यात. अशी येथील अनुयायांची मागणी आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वडिलांकडे मायणी तलावाच्या देखरेखीचे काम असल्याने डॉ.बाबासोहबांच्या बालपणाचे काही दिवस मायणी परिसरात गेल्याबाबतच्या आठवणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः चरित्रकार चांगदेव खेरमोडे यांना सांगितलेल्या आहेत. चरित्रकार चांगदेव खैरमोडे यांचे पाचवड गाव अर्थातच मायणीच्या सीमेवर आहे.त्यामुळे या गावांना ऐतिहासिक महत्त्व आहे. या ऐतिहासिक स्मृतींचे चिंतन करून सुभेदार रामजी आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले.बाळासाहेब कांबळे यांनी आभार मानले.

# कर्णकर्कश बुलेटस्वारांवर ग्रामीण पोलिसांचा दणका

## ३२ मॉडिफाईड सायलेन्सर जप्त करून रोडरोलरने नष्ट

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण जिल्ह्यात कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट दुचाकींमुळे सर्वसामान्य नागरिक, रुग्ण, वृद्ध, महिला व लहान मुलांना होणारा त्रास लक्षात घेता ग्रामीण पोलिसांनी विशेष मोहीम राबवून कडक कारवाई केली आहे. या मोहिमेत बेकायदेशीरपणे मॉडिफाय केलेले ३२ सायलेन्सर जप्त करण्यात आले असून, ते रोडरोलरने चिरडून नष्ट करण्यात आले.

मा. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्या आदेशानुसार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि सायलेन्सरमध्ये अनधिकृत बदल केलेल्या बुलेट वाहनांविरोधात जिल्हाभर विशेष तपासणी मोहीम हाती घेण्यात आली. पैठण, वैजापूर, गंगापूर, कन्नड, सिल्लोड व फुलंब्री तालुक्यांमध्ये वाहतूक शाखा व स्थानिक पोलीस ठाण्यांच्या संयुक्त पथकांनी




ही कारवाई केली.या कारवाईदरम्यान नियम मोडणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हे दाखल करून संबंधित बुलेट दुचाकींवरील मॉडिफाईड सायलेन्सर तात्काळ काढून घेण्यात आले. रुग्णालय परिसर, वसाहती, शाळा, बाजारपेठा व चौकांमध्ये कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांना मोठा मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याच्या अनेक तक्रारी ग्रामीण पोलिसांकडे प्राप्त झाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर दि. ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी पोलीस मुख्यालय, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे जप्त सायलेन्सर रोडरोलरने चिरडून नष्ट करण्यात आले. हा उपक्रम समाजाला कडक संदेश देणारा असून, बेकायदेशीर बदलांविरोधात पोलिसांची शून्य सहनशीलतेची भूमिका कायम राहील, असे डॉ. विनयकुमार राठोड यांनी स्पष्ट केले.

वाहनांमध्ये अनधिकृत बदल करून कर्णकर्कश आवाज करणाऱ्यांमुळे समाजातील शांतता भंग होते. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी ही मोहीम असून, भविष्यातही अशी कारवाई नियमितपणे सुरू राहील, असेही त्यांनी सांगितले.

ग्रामीण पोलीस दलाने सर्व वाहनचालकांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आणि वाहनांमध्ये कोणतेही बेकायदेशीर बदल न करण्याचे आवाहन केले असून, नियम मोडणाऱ्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा दिला आहे.

# चंद्रमणी बुद्ध विहारातर्फे लहान मुलांसाठी एकदिवसीय धम्म सहलीचे आयोजन



**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**मुंबई । प्रतिनिधी**

गोरेगाव (पश्चिम) येथील चंद्रमणी बुद्ध विहारात दर रविवारी राबविण्यात येणाऱ्या 'दर रविवारी बुद्ध विहारी' उपक्रमाअंतर्गत नुकतेच लहान मुलांसाठी एकदिवसीय धम्म सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीदरम्यान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा दादर येथील राजगृह बंगला, आंबेडकर भवन, वरळी येथील त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची समाधी तसेच चैत्यभूमी या धार्मिक व ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्यात आल्या.

या धम्म सहलीसाठी धम्म सेविका उषाताई तिरपुडे यांनी बसची सुविधा उपलब्ध करून दिली, तर शाखेचे अध्यक्ष व महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक 'कोकण रत्न' मंगेश जाधव यांनी सर्व सहभागींसाठी भोजनाची व्यवस्था केली होती. सदर सहल यशस्वी करण्यासाठी मनोहर तांबे , विवेक शिर्के, रंजीत तांबे, संदेश मोरे, राज लोखंडे, दिव्या मोरे, श्रीमती कांबळे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# डॉ.आंबेडकरांचे निकटवर्तीय सहकारी बळवंतराव वराळे यांच्या १२४ व्या जयंतीनिमित्त विशेष गौरव सोहळा संपन्न

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निकटवर्तीय सहकारी बळवंतराव (बी.एच.) वराळे यांच्या १२४ व्या जयंतीनिमित्त विशेष गौरव सोहळा दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी सायं. ४ वाजता डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, नागसेनवन येथे उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या नाट्य व चित्रपट अभिनेत्री चिन्मयी सुमित यांनी विचार मांडताना सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समकालीन सहकारी बळवंतराव वराळे हे माझ्यासाठी आजोबांसमान होते. लहानपणी त्यांना जवळून पाहण्याचा मला योग आला. त्यांचे करारी, धाडसी नेतृत्व आणि आंबेडकरी चळवळीतील योगदान हे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सांगाती' या ऐतिहासिक पुस्तकातून समोर येते. हे पुस्तक मराठीबरोबरच इंग्रजीतही अधिकाधिक वाचकांसाठी उपलब्ध व्हावे. जगण्यासाठी जसा श्वास आवश्यक आहे, तसाच माणूस म्हणून सन्मानाने जगण्यासाठी डॉ. आंबेडकरांचे विचार आचरणात उतरवणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मालती वराळे यांच्या हस्ते विशेष गौरव सोहळार्थी शांताराम बापू पंदेरे, डॉ. सुनिती धारवाडकर आणि मिलिंद मानकर या तिघांना आम्ही भारतीय हे विशेष सन्मानचिन्ह प्रदान करून गौरविण्यात आले. गौरव सोहळार्थींनी यावेळी आपली मनोगते व्यक्त केली.

कार्यक्रमात कुणाल वराळे व चेतन चोपडे यांनी प्रबोधनपर गीतांचे सादरीकरण केले.




प्रतिष्ठानचे सदस्य विष्णू मास्ते, प्रकाश वराळे, ज्ञानदेव निंबाळकर, व्ही. के. वाघ, सुधा वराळे, प्रतिभा जाधव, गौतम कांबळे, लहुकांत मधाळे यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर - रेखा मेश्राम, अर्चना गणवीर, मंगला राजकन्या गोंडावणे-खिवंसरा, शिरसाट सर, शकुंतला धांडे, प्रज्ञा दुर्गे, निता पट्टेकर, ऊर्जा मिसाळे, जयश्री भगत, वर्षा जाधव, प्रज्ञा साळवे, दिलीप घाटगे, नरहरी कांबळे, निरंजन माने, मुन सर, अजय देहाडे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अँड. इंदुमती वराळे यांनी केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी वर्षा घोबले व मनिषा घाटगे यांनी सांभाळली, तर आभार प्रदर्शन परिक्षीत वराळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बुद्धभूषण मोर, अभिषेक सुरडकर, धम्मा वाहुळ, चेतन गाडे, सांची वराळे, प्रेक्षा मिसाळ आणि कुणाल वानखेडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ईब्राहिमपूर येथे रामजी बाबांच्या स्मृतिदिनानिमित्त भव्य बौद्ध धम्म परिषद; भिक्खू संघाच्या धम्मदेशनाने उपासक मंत्रमुग्ध

**निळे प्रतीक न्यूज नेटवर्क**
**भोकरदन (प्रतिनिधी)**

तालुक्यातील ईब्राहिमपूर येथे बोधिसत्व महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील सुभेदार रामजी बाबा आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित करण्यात आलेली एकदिवसीय दुसरी बौद्ध धम्म परिषद सोमवार, २ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात व मंगलमय वातावरणात पार पडली. अखिल भारतीय भिक्खू महासंघाचे भदन्त राहुलराज (छत्रपती संभाजीनगर) यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद संपन्न झाली.परिषदेच्या निमित्ताने सकाळपासूनच संपूर्ण गावात आनंदी व भक्तिमय वातावरण पाहायला मिळाले. उपासक, उपासिका तसेच



बालिकांच्या सहभागाने भिक्खू संघाच्या स्वागतासाठी फुलांची पुष्पवृष्टी करत गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली.या धम्म परिषदेचे उद्घाटन भदन्त संघरत्न व भदन्त रोहित यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भदन्त वेस्सभू थेरो, भदन्त संघरत्न, भदन्त रोहित, भदन्त राहुलराज तसेच पूज्य भदन्त भिक्खू यांनी उपस्थित उपासक-उपासिकांना आपल्या प्रवचनातून बुद्ध धम्माचा गूढ व मानवकल्याणकारी संदेश दिला.पूज्य भदन्त संघरत्न यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की, बुद्धांनी प्रत्येक क्षण मंगलमय असल्याचे सांगितले आहे. धम्माचे आचरण करण्यासाठी वाईट वेळ किंवा दुःखाची वेळ नसते; ती परिस्थिती आपण स्वतः निर्माण करतो. तथागत गौतम बुद्धांनी २५६८ वर्षांपूर्वी संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी सद्धम्म दिला असून, त्या सद्धम्माच्या आचरणासाठी प्रत्येक काळ मंगलमय आहे. त्यांनी चार आर्य सत्ये-दुःख, दुःखसमुदय, दुःखनिरोध आणि दुःखनिरोधगामिनी प्रतिपदा-यांचे सविस्तर विवेचन केले.या परिषदेसाठी उपस्थित शेकडो उपासक-उपासिकांसाठी भोजनदानाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ८ वाजता मंठा येथील महिंद्रा मोरे यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमाने वातावरण अधिकच भारावून टाकले.या धम्म परिषदेला सेवानिवृत्त अप्पर जिल्हाधिकारी [illegible] घेवंदे, सरपंच रामसिंग डोभाळ, दिलीप साळवे (सेवानिवृत्त विस्तार अधिकारी, पं.स. भोकरदन), डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष सचिन पारखे, बुद्धगया मुक्ती आंदोलनाचे सारथी आदित्य सोनवणे, तसेच पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ व परिसरातील शेकडो बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.धम्म परिषद यशस्वी करण्यासाठी पूज्य भदन्त राहुलराज यांच्या मार्गदर्शनाखाली ईब्राहिमपूर येथील समस्त बौद्ध उपासक-उपासिकांनी विशेष परिश्रम घेतले. परिसरातील उपासक-उपासिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत या धम्म परिषदेचे महत्व अधोरेखित केले.